तात्काळ

अा. क्र. 22.

जा. क्रमाध्य-३[१४]नमाशा/मान्यता
पुवि/ ९४-९५.
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१
यांचे कार्यालय,
दिनांक :- २१/१२/१९९४

प्रति,
सचिव,
अवामी तालीमी मर्कज बाजार मस्जीद,
घोडनदी, जि. पुणे
शिरुर

विषय :- सन १९९४-९५ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत.

संदर्भ :- शासन पत्र क्रमांक:-एसएसएन- १०९४/ ५११५ /माशि-१, दि. १५/१०/

शासनाने संदर्भिय पत्रान्वये आपल्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळा परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खालील दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून-१९९४ पासून विनाअनुदान तत्वावर/ तत्वावर "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा, माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर परवानगी देण्यात येत आहे.

१] या नवीन माध्यमिक शाळांना [इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्रमांक एसएसएन-१०८८/१६६९-एन, माशि-१, दि. १०.२.८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सुत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

२] सदर माध्यमिक शाळांना शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे[उदा: विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

३] सदर संस्थांची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

४] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्य काळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही व आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी[ई. बी. सी.] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षाचे सहीचे लेखी हमीपत्र या कार्यालयाकडे पाठविण्यात यावे.

५] जादा उघडण्यात आलेल्या तुकडयांतून खात्याने पाठविलेले प्रवेश प्राधान्याने देण्यात यावेत. तसेच प्रवेशाच्यावेळी विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची देणगी स्विकारण्यात येवू नये.

६] महाराष्ट्र शैक्षणिक संस्था [प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फीज] कायदा १९८७ अन्वये कोणत्याही प्रकारची देणगी/वर्गणी विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात येवू नये.

७] माध्यमिक शाळा संहिता व महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी [सेवेच्या शर्ती] नियमावली १९८१ अन्वये आखून देण्यात आलेल्या नियमानुसार शाळेचे कामकाज करण्यात येईल.

८] संस्थेने मान्य प्रशिक्षित कर्मचारी वर्ग तसेच १०० बिंदू रोस्टरप्रमाणे कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यात येईल.

९] शिक्षक/कर्मचारी संच शिक्षणाधिकारी [माध्य.] यांचेकडून मंजूर करुन घेण्यात येईल.

१०] माध्यमिक शाळा संहिता कलम ८३ नुसार सर्व प्रकारचे शालेय रेकॉर्ड अद्ययावत व परिपूर्ण ठेवण्यात येईल.

११] शालेय वातावरण, इमारत, प्रयोगशाळा इ. बाबी नियमानुसार व आवश्यक त्या सुविधासह ठेवण्यात येतील.

१२] माध्यमिक शाळा संहिता कलम ४९.३ अन्वये मा. शिक्षण संचालक, यांची पूर्वपरवानगी शिवाय जादा फी आकारण्यात येणार नाही.

इतर अटी :-

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अगर केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत आहे.

२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतली नाही.

४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत. अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही

वरील बाबीपैकी एक जरी बाब आपल्या संस्थेच्या विरोधात असल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | अवामी-तालिमी मर्कज ट्रस्ट | शिरुर | आठवी जून ९४ पासून | उर्दु |

आपल्या शाळेला खात्याची प्रथम मान्यतेसाठी शाळा संहिता नियमावली ३.१ नुसार शाळा सुरु झाल्यापासून एक महिन्याचे आत विहित प्रपत्रात अर्ज करणे आवश्यक आहे. तसेच मंडळाची प्रथम मान्यतेकरिता महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या विभागीय मंडळाने संस्थांना मान्यता देण्याची पध्दती मधील नियम १ ते १५ पर्यंत विहित केलेल्या नियमाप्रमाणे व प्रपत्रात अर्ज करावा.

स्थल प्रतीवर शिक्षण उपसंचालक यांची स्वाक्षरी आहे.

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.

प्रतिलिपी:-

१] शिक्षणाधिकारी [माध्यमिक] जि. प. पुणे यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीकरिता अग्रेषित.

त्यांनी वरील नवीन शाळेस तात्काळ भेट देवून पत्रात नमुद केलेल्या अटी व बाबी संस्था पूर्ण करते किंवा नाही याची तपासणी करून अहवाल त्वरित या कार्यालयास पाठवावा. तसेच संस्थेविरुध्द तक्रारी व गैरव्यवहाराची उदाहरणे आपल्या कार्यालयांस प्राप्त झाले असल्यास त्या विषयी सविस्तर अहवाल या कार्यालयांस सादर करावा. सदर नवीन माध्यमिक शाळेस प्रथम मान्यता देण्याबाबतची कार्यवाही तात्काळ करावयाची असल्याने शाळेची वर्ग-२ पेक्षा कमी नसणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तपासणी करून आपल्या अभिप्रायांसह तपासणी अहवाल त्वरित या कार्यालयास पाठविण्याची व्यवस्था करावी.

२] मा. उपसचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२.

३] मा. शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांना सविनय सादर.